दैनिक जनसंजीवनी पाहिजेत

पुणे जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक जनसंजीवनी साठी विविध सुविधा व आकर्षक मानधनवर वार्ताहर व जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे.

डेटलाईन

* पुणे शहर * कात्रज * शिवाजीनगर * रास्तापेठ * कर्वेनगर * वारजे * सिंहगडरोड * सासवड * लक्ष्मीरोड * टीळकरोड * सदाशिवपेठ *डेक्कन जिमखाना * पुणे शहर (पद ०३) * जाहिरात प्रतिनिधी

जाहिरात प्रतिनिधी म्हणून काम केलेल्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य उत्तम जनसंपर्क व परिसरातील माहिती आवश्यक

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपले अर्ज व सविस्तर माहितीसह खालील दिलेल्या मेल वर पाठवावे.

व्यवस्थापक, दैनिक जनसंजीवनी
editor.jansanjivani@gmail.com
संपर्क - +91 9823 752 964

दैनिक
जनसंजीवनी
JANSANJIVANI

पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, सोलापूर, कोल्हापूर

अहिल्यानगर ▶ वर्ष २ ▶ अंक १६० ▶ मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर २०२६ ▶ पाने ४ ▶ किंमत रू १ ▶ PRGI No. MHMAR/25/A0143

Ahilyanagar ▶ Vol. 2 ▶ Issue 160 ▶ Tuesday, 17 November 2026 ▶ Pages 4 ▶ Price 1 ▶ PRGI No. MHMAR/25/A0143

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न

रोहित पवारांचा आरोप, मफलर मॅन म्हणून देवेंद्र फडणवीसांचा फोटो दाखवला

जनसंजीवनी वृत्तसेवा

मुंबई – अजितदादांच्या अपघातामागे असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातील एक नेता करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी या आधी केला होता. त्याचं नाव आता रोहित पवारांनी जाहीर केलं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असा आरोप रोहित पवार यांनी केला. देवेंद्र फडणवीस हे व्ही के सिंहच्या जयपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. त्यांनीच या कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. यामध्ये जर चूक असेल तर सरकारने तपास करावा, असं आव्हानही रोहित पवार यांनी केलं.

या सरकारने व्ही के सिंह आणि त्याच्या कंपनीला जरी वाचवण्याचा प्रयत्न केला असला तरी आमचं सरकार आलं तर त्याला सोडणार नाही. त्यांचा हा पुतण्या कुणालाही सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

व्ही. के. सिंह आणि व्हीएसआर कंपनीला वाचवणारे देवेंद्र फडणवीस हेच नेते आहेत असं आमचं ठाम मत आहे. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, यांच्याकडे सत्ता आहे, सीआयडी आहे. पंतप्रधान त्यांचं ऐकतात, सीबीआय त्यांचं ऐकू शकते. पण आतापर्यंत तपास का होत नाही? याचं मुख्य कारण म्हणजे आपले मुख्यमंत्री फडणवीस हे व्ही. के. सिंह याचे निकटवर्तीय आहेत, असं आमचं ठाम मत आहे.

आम्ही जर आमच्या काकाला न्याय देऊ शकलो नाही तर गरीबांना न्याय काय देणार? असा प्रश्न सातत्याने मनाला पडतोय. त्यामुळे मी जर दादांना न्याय देण्यासाठी काही गोष्टी समोर आणल्या तर उद्या माझे राजकारण धोक्यात येऊ शकेल. पण माझ्यावर त्याचा काही परिणाम होणार नाही. मी ज्या व्यक्तीचं नाव घेत आहे त्या व्यक्तीने अजितदादांचा घातपात केला असं मी म्हणत नाही. परंतु, अजितदादांचा अपघात झाला त्या कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न त्याच्याकडून केला जात असल्याचा आम्हाला संशय आहे, असं रोहित पवार म्हणाले.

अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासामध्ये सरकारी स्तरावरून काहीही प्रयत्न होत नाही, (पान ४ वर)





दिवंगत अजित पवार ग्रामीण विकास व सहकार क्षेत्रातील ज्ञानकोष आणि नव्या नेतृत्वासाठी विद्यापीठ-केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

लोकनेते अजितदादा पवार नामकरण व पुतळ्याचे अनावरण

जनसंजीवनी वृत्तसेवा

पुणे – दूध संघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, साखर कारखाने, नागरी सहकारी बँका आणि जिल्हा सहकारी बँकांच्या कामकाजाची इत्थंभूत माहिती असलेले अजितदादा हे ग्रामीण विकास व सहकार क्षेत्राचे चालते-बोलते ज्ञानकोश होते आणि त्याची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव केला.

पुणे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उभारण्यात आलेल्या लोकनेते अजितदादा पवार यांच्या अर्धांकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला 'अजितदादा पवार प्रवेशद्वार' असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर नेहरू मेमोरियल हॉल येथे आयोजित कार्यक्रमात शाह बोलत होते.

अजितदादांच्या कार्याचे स्मरण करताना केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, अजितदादा अखेरपर्यंत पुणे जिल्हा, बारामती आणि पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांसाठी आग्रही होते. सर्वोच्च पदावर पोहोचल्यानंतरही जमिनीशी नाळ जोडून ठेवणारे आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणारे त्यांच्यासारखे नेतृत्व दुर्मीळ असते. साखर कारखान्यांवरील प्राधिकराचा प्रश्न सोडविण्यासाठी अजितदादांनी सातत्याने पाठपुरावा केला. एखाद्या प्रश्नाचे महत्व ओळखून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. कोविडच्या संकटकाळातील त्यांच्या कार्यतत्परता आणि नागरिकांना वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी त्यांनी केलेला पाठपुराव्यातून लोकांच्या प्रश्नांप्रती असलेली त्यांची आस्था आणि जबाबदारीची जाणीव दिसून येते.

बारामतीच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान होते. बारामतीला देशातील सर्वाधिक विकसित मतदारसंघापैकी एक बनविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. लोकदरबाराच्या माध्यमातूनच जनतेच्या अडचणी समजतात आणि सामान्य नागरिकाला कधीही भेटता आले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. विकासासाठीचे नियोजन, सातत्य आणि चिकाटीने उद्दिष्ट साध्य करण्याची त्यांची कार्यपद्धती अनुकरणीय होती, असेही शाह म्हणाले. अजितदादांची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे. लोकांशी संवेदनशीलतेने वागणे, कामाचे नियोजन, शिस्त आणि निश्चित वेळेत काम पूर्ण करण्याची त्यांची हातोटी नव्या पिढीने आत्मसात करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला अजितदादांचे नाव देणे आणि यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याशेजारी त्यांचा अर्धांकृती पुतळा उभारणे ही समाधानाची बाब आहे. या माध्यमातून पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याची ओळख होऊन प्रेरणा मिळेल, असेही शाह यांनी नमूद केले.

अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते कणखर, शिस्तप्रिय, (पान ४ वर)

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाचा धोका; ३ राज्यांना पावसाचा अलर्ट

जनसंजीवनी वृत्तसेवा

नवी दिल्ली – बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले तीव्र कमी दाबाचे क्षेत्र सोमवार सायंकाळपर्यंत चक्रीवादळात रूपांतरित होऊ शकते. त्यानंतर, हे वादळ वायव्य दिशेला सरकून आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने जाण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने १७ ते २१ नोव्हेंबर दरम्यान तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि ओडिशामध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. १९ आणि २० नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. जोरदार वारे आणि समुद्रात उसळणाऱ्या उंच लाटा लक्षात घेता, मच्छिमारांना २० नोव्हेंबरपर्यंत समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. राजस्थानमध्ये दोन दिवस झालेल्या पावसामुळे सोमवारी थंडीत वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या मते, राज्यातील हवामान पुढील तीन ते चार दिवस कोरडे राहण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशात २० नोव्हेंबरनंतर पावसाची शक्यता आहे.

सेलिब्रिटींना माफियांच्या खुल्या धमक्या, हर्षवर्धन सपकाळ यांचा सत्ताधाऱ्यांना सवाल

जनसंजीवनी वृत्तसेवा

मुंबई – राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून गुजरातच्या तुरुंगातून माफिया राज चालवले जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ''केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्रात असतानाही बॉलिवूड कलाकारांना माफियांच्या खुल्या धमक्या येत आहेत. अशा गंभीर परिस्थितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यात काय फुगड्या घालत आहेत का?'' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सोमवारी मुंबईतील टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी बॉलिवूडमधील दहशतीचे वातावरण, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक, राहुल गांधींचा दौरा आणि वेजापूरमधील रोहित पठारे हत्याकांडावरून केंद्र व राज्य सरकारवर चौफेर टीका केली.

राज्यातील गुंडगिरी आणि बॉलिवूडमधील भीतीच्या वातावरणावर भाष्य करताना सपकाळ यांनी केंद्र आणि राज्य सरकारला धारेवर धरले. बॉलिवूडमधील अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शकांना खुलेआम धमक्या दिल्या जात आहेत. अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर गोळीबार झाल्यानंतर आता महानायक अमिताभ बच्चन यांना लक्ष्य केले जात आहे. हल्ल्याच्या भीतीमुळे अमिताभ बच्चन यांना बुलेटप्रुफ काचेमागून आपल्या चाहत्यांना भेटावे लागत आहे, ही अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. (पान ४ वर)

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत धीरज देशमुखांच्या सहकार पॅनलला स्पष्ट बहुमत

जनसंजीवनी वृत्तसेवा

लातूर – लातूर जिल्हा बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या निकालासंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. लातूर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत १४ जागी काँग्रेस नेते धीरज देशमुखांचे सहकार पॅनल विजयी झालं आहे. तर पाच जागेवर भाजपच्या परिवर्तन पॅनलने विजय मिळवला आहे. काँग्रेस नेते धीरज देशमुखांचं सहकार पॅनल जरी सत्तेत आलं असले तरी भाजपची या निवडणुकीच्या निकालातील जोरदार मुसंडी दिसून आलीय.

दरम्यान, सर्वांचं लक्ष लागून राहिलेल्या निलंगा येथून भाजप नेते संभाजी पाटील निलंगेकर यांचे बंधू आणि परिवर्तन पॅनलचे उमेदवार अरविंद पाटील निलंगेकर यांनी मोठा विजय मिळवला आहे. अरविंद पाटील निलंगेकर यांनी त्यांच्या काकी संगीता अशोक पाटील निलंगेकर यांचा पराभव केलाय. तर यात भाजपचे आमदार रमेश कराड यांचे चिरंजीव ऋषिकेश कराड हे विजयी (पान ४ वर)

दरम्यान, १९ जागे पैकी १४ ठिकाणी काँग्रेसच्या सहकार पॅनलने विजय मिळवला आहे. पाच ठिकाणी परिवर्तन पॅनल विजय मिळवला आहे. यात संभाजी पाटील निलंगेकर यांचे बंधू अरविंद पाटील निलंगेकर बंधू अरविंद पाटील निलंगेकर विजयी झाले आहेत. तर त्यांनी त्यांची काकी संगीता अशोक पाटील निलंगेकर यांचा पराभव केलाय. तर यात भाजपचे आमदार रमेश कराड यांचे चिरंजीव ऋषिकेश कराड हे विजयी (पान ४ वर)

बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर

जनसंजीवनी वृत्तसेवा

नवी दिल्ली – बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील दोन आरोपींच्या जन्मठेपेच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे आणि या दोन्ही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. या आरोपींनी १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगात घालवला आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाकडून त्यांच्या पुढच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे आणि जामीन मंजूर केला आहे. या दोन्ही आरोपींच्या वकिलांनी हा दावा केला की दोन आरोपींपैकी एकजण हा दिव्यांग आहे. त्यामुळे त्याला दिलासा देण्यात आला आहे. जस्टिस एमएम सुंदरेश आणि जस्टिस प्रसन्ना बी वराले यांच्या पीठाने हा आदेश दिला आहे.

२८ ऑक्टोबरला बिल्कीस बानो प्रकरणातील दोन आरोपींच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आणि त्यांना जामीन मंजूर करण्यात आला. आपल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की १७ वर्षांहून अधिक काळ दोन्ही आरोपींनी तुरुंगात घालवला आहे. (पान ४ वर)

एससी, एसटी आरक्षणावर सुप्रीम कोर्टाचा निर्णय; जिल्हा परिषदेत रोटेशन पद्धतीवर सरकारचा हक्क मान्य

जनसंजीवनी वृत्तसेवा

नवी दिल्ली – सुप्रीम कोर्टाने देशातील निवडणूक आरक्षण आणि मतदारसंघांच्या रोटेशनसंदर्भात सोमवारी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. कायद्यानुसार एससी, एसटी समुदायांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळते, परंतु एखादा विशिष्ट मतदारसंघ कायमस्वरूपी किंवा ठराविक कालावधीसाठी आरक्षित राहील याची हमी दिली जात नाही असं कोर्टाने म्हटलं. हे प्रकरण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागांच्या आरक्षणाशी संबंधित होते. आरक्षणाचा उद्देश साध्य करण्यासाठी कायदेशीर चौकटीचे पालन करणे आवश्यक असले तरी जागांचे आरक्षण वैयक्तिक पसंतीच्या आधारावर ठरवता येणार नाही असं कोर्टाने स्पष्ट केले.

२०२५ मध्ये महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधील आरक्षणाच्या रोटेशनसाठी नवीन नियम लागू केले. या नियमांनी १९९६ च्या जुन्या नियमांची जागा घेतली. नवीन नियमांमधील नियम १२ नुसार आरक्षित जागांच्या रोटेशनची गणना करण्यासाठी एक नवीन आधार निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार २०२५ च्या दुरुस्तीनंतर होणारी पुढील सार्वत्रिक निवडणूक ही रोटेशनची सुरुवात मानली जाईल. या वादाला आव्हान देणारी याचिका सुरुवातीला मुंबई हायकोर्टाने फेटाळून लावली होती. नंतर याचिकाकर्त्यांने हे नियम बदल रद्द करण्यासाठी सुप्रीम कोर्टात अपील केले.

नवीन नियमामुळे आरक्षणाचे रोटेशन केवळ कागदोपत्री मर्यादित (पान ४ वर)

वडेट्टीवारांना खासगीत विचारलं तर तेही म्हणतील मतदारसंघ पुनर्रचना झालीच पाहिजे; चंद्रशेखर बावनकुळेंचा टोला

जनसंजीवनी वृत्तसेवा

नागपूर – मतदारसंघ पुनर्रचनेच्या (डीलिमिटेशन) मुद्द्यावरून सुरू असलेल्या राजकीय वादात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेत्यांवर जोरदार निशाणा साधला आहे. ''विजय वडेट्टीवार किंवा नाना पटोले यांना खासगीत विचारले, तर तेही सांगतील की विकासासाठी मतदारसंघांची पुनर्रचना झालीच पाहिजे. मात्र, त्यांचे नेते राहुल गांधी फटकारतील या भीतीने ते उघडपणे बोलत नाहीत,'' असा सणसणीत टोला बावनकुळे यांनी लगावला आहे.

सोमवारी (१६ नोव्हेंबर) माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मतदारसंघ पुनर्रचना, आदिवासी शेतकऱ्यांना मालकी हक्काचा सात-बारा ही देण्याची मोहीम, १५ लाख शेतकऱ्यांना फार्म आयडी, दुष्काळ निवारण आणि हिवाळी अधिवेशनातील काटकसर यांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर भाष्य केले.

मतदारसंघ पुनर्रचनेचे समर्थन करताना बावनकुळे यांनी प्रत्यक्ष लोकप्रतिनिधींना वेणाऱ्या अडचणी मांडल्या. ते म्हणाले की, सध्या एक-एक लोकसभा मतदारसंघ ३०० किलोमीटरपर्यंत पसरलेला आहे, तर विधानसभा मतदारसंघ १५० किलोमीटरचे आहेत. एवढ्या मोठ्या मतदारसंघात खासदार किंवा आमदार जनतेशी संपर्क कसा साधणार आणि विकासकामे कशी करणार? मतदारसंघ जेवढे लहान होतील, तेवढा विकास अधिक वेगाने होईल. जे सध्या लोकसभा किंवा विधानसभेत प्रतिनिधित्व करत नाहीत, त्यांना या अडचणींची कल्पना नसते, असा टोलाही त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला. तसेच, राहुल गांधी यांनी परदेश दौऱ्यात जाऊन भारताची ताकद जगाला दाखवावी, मात्र भारताची बदनामी करू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

महसूल विभागाने राज्यातील आदिवासी समाजाच्या शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयाची माहिती बावनकुळे यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच राज्यातील सर्व वनपट्टाधारक आदिवासी शेतकऱ्यांना सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या सातबाऱ्याप्रमाणेच सात-बारा ही नावाचे मालकी हक्काचे प्रॉपर्टी कार्ड दिले जात आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांतील किमान ३५ विधानसभा मतदारसंघांमध्ये ही मोहीम राबवली जाणार असून, १५ डिसेंबरपर्यंत सर्व पात्र आदिवासींना वनपट्टा आणि सात-बारा ही वाटपाचे काम पूर्ण केले जाईल. मालकी हक्क मिळाल्यामुळे आता आदिवासी शेतकऱ्यांची धान खरेदी शासनामार्फत होऊ शकेल, तसेच त्यांना पीक विमा, नुकसान भरपाई, बँक कर्ज आणि किसान सन्मान योजांसारख्या केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा थेट लाभ मिळेल.

राज्यात असे सुमारे १५ लाख शेतकरी आहेत, जे पिढ्यानपिढ्या जमीन कसत आहेत, मात्र तांत्रिक कारणांमुळे त्यांच्या नावावर मालकी हक्क किंवा फार्म आयडी नाही. यामध्ये विदर्भातील भूदान व सिलिंग लँड, मराठवाड्यातील निजामाची मदत-मास व खिदमत-मास जमीन, उत्तर महाराष्ट्रातील जहागीरदार जमीन, पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमीन तसेच पालधर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमधील कष्टकरी शेतकऱ्यांचा समावेश आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसत असल्याचा किंवा कृषी उत्पन्न बाजार समितीत माल विकल्याचा पुरावा असलेल्या या सर्व १५ लाख शेतकऱ्यांना सरकारने फार्म आयडी देण्याचा निर्णय घेतला आहे.

स्थापना १९८८
रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त संस्था
३८ वर्षांची विश्वासनीय परंपरा असलेली संस्था
ज्योती
सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगांव.
ज्योती सर्कल, मेनरोड, कोपरगांव ४२३६०१ फोन नं.- ०२४२३-२२१०५५ / २२३०५५
शाखा - कोपरगाव, शिर्डी, सुरेगांव (कोऱ्हाळेवाडी), कोल्हार, राहुरी, श्रीरामपुर, येवला, अहिल्यानगर,पुणे
अॅड. बी.रविकाका कोरावके
चेअरमन
आर्थिक स्थिती
ठेवी - ४२० कोटी
कर्ज - २८० कोटी
गुंतवणूक - ९६९ कोटी
स्वनिधी - ३० कोटी
नफा - ४ कोटी ५० लाख
एकुण व्यवसाय - ७०० कोटी
कायम मालमत्ता - २.४० कोटी
नेट एन.पी.ए. - ०.०० %
सी. डी. रेशो - ६६ %
ऑडिट वर्ग - सतत अ
विनम्र व तत्पर सेवा
सोने तारण कर्ज, लॉकर्स सुविधा, NEFT / RTGS सुविधा, SMS सुविधा,मोबाईल कलेक्शन, सुलभ कर्ज वितरण सुविधा, ज्योती मोबाईल बँकिंग, ई पतन सुविधा,कोअर बँकिंग सुविधा